# नियमित दिवाणी मुकदमा क्र.६३/२००८ मधील नि.९८ खालील आदेश
## (CNR-MHSN090006472008)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी. ऑर्डर २६ रुल ११ प्रमाणे निमताना मोजणीकरिता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तूत दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमीत मिळकतीचा कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतकामी वाद मिळकतीची मोजणी होणेसाठी अर्ज दिलेला होता व त्याप्रमाणे मोजणी होवून याकामी अहवाल दिलेला आहे. परंतू सदर अहवालामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत. त्यामूळे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तासगांव यांचेकडे निमताना मोजणी होणे जरुरीचे आहे. याकामी न्यायालयाने वाद मिळकतीची मोजणी करणेचा आदेश केलेला आहे व तसा अहवाल आलेला आहे. सदर अहवालाप्रमाणे हद्दी कायम होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. सबब, सदर मिळकतीची मोजणी करणेकरिता तालुका निरीक्षक भूमी, अभिलेख, तासगांव यांची नेमणूक करावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी नि.१०० कडे म्हणणे दाखल कले आहे. वादीने असे अभिकथन केले आहे की, वादीचा अर्ज सी.पी.सी. कायदयातीतील तरतूदीमध्ये बसत नाही. वादीने यापूर्वी नि.७२ व नि.९४ ला सदर अर्जात नमूद केलेली कारणे घालून पुनःश्च अर्ज दिलेला होता. त्याप्रमाणे न्यायालयाने नि.७२ च्या अर्जाप्रमाणे कोर्ट कमिशनरची नेमणूक केली होती व त्याप्रमाणे नि.८७ ला उपअधिक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांनी कोर्ट कमिशन अहवाल दाखल केला आहे. त्यानंतर वादी यांनी नि.९४ ला अर्ज देवून उपअधिक्षक भूमीअभिलेख यांचा अहवाल बदलून मागितला होता, परंतू सदरचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. उपअधिक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांनी अहवाल दाखल करुन दावा मिळकतीबाबत संपूर्ण वस्तूस्थिती व परिस्थिती सादर केली आहे. उपअधिक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांनी कोणतीही त्रुटी न राखता संपूर्ण दावा मिळकतीची परिस्थिती न्यायालयात सादर केली आहे. वादी यांचा बेकायदेशीर व खोटा पुरावा न्यायालयासमोर आणण्याचा प्रयत्न दिसून येतो. वादीने केवळ दावा मिळकतीबाबत पुरावा गोळा करण्याकरिता सदरचा अर्ज दिला आहे. वादी यांनी दाव्यामध्ये नमूद केलेल्या चतुःसीमा याच मुळात चुकीच्या आहेत. उपअधिक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांनी तंतोतंत चतुःसिमापूर्वक व चतुःसिमेमधील लोकांची नांवे नमूद

करुन अहवाल दाखल केला आहे. वादीने दाव्यात नमूद केल्याप्रमाणे अर्जामधील कोर्ट कमिशनची मागणी ही वेगळया मिळकतीबाबतची आहे व वादीचे खरेदीपत्र हे वेगळया मिळकतीबाबतचे आहे. कोर्ट कमिशनर यांनी वादी पुर्वेला नसल्याबाबतचे मान्य केले आहे तसेच पश्चिमेस प्रतिवादी असलेबाबत व दाव्यात नमूद केल्याप्रमाणे पुर्वेकडून कुठलेही अतिक्रमण नसल्याचे अहवालामध्ये नमूद केले आहे. वादीच्या दाव्यात प्रतिवादींनी पुर्वेकडून अतिक्रमण केले आहे असे नमूद केले आहे. परंतू नि.८७ च्या अहवालामध्ये पुर्वेस प्रतिवादी नसून पश्चिमेस असल्याचे व प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण केले नसल्याचे नमूद केले आहे. वादीने सदरचा अर्ज नवीन पुरावा गोळा करण्याकरिता व दावा लांबविणेचे हेतूने दाखल केला आहे. निमताना मोजणी करण्याचे अधिकार निरीक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांना नाहीत. न्यायालयाचे नि.७२ च्या आदेशानुसार कोर्ट कमिशनर यांनी मो.र.नं.२१५ अन्वये दिनांक २५.०५.२०१८ रोजी वादी, प्रतिवादी व वादीचे वारस यांचे जबाब घेवून पंचनामा करुन मोजणी नकाशा तयार करुन हद्दी दर्शविल्या आहेत. त्यामूळे वाद मिळकतीची पूर्ण परिस्थिती व वस्तूस्थिती न्यायालयासमोर आली आहे. कोर्ट कमिशन अहवालामध्ये कोणतीही त्रुटी राहिलेली नाही. सबब वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावे अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. वादीतर्फे वकील श्री.एस.एम.पाटील यांनी सदर अर्जावर असा युक्तीवाद केला आहे की, न्यायालयाने वाद मिळकतीचा मोजणी करणेचा आदेश केला होता व तसा अहवाल आलेला नाही. त्या अहवालाप्रमाणे वाद मिळकतीच्या हद्दी कायम होणे जरुरीचे आहे. याउलट प्रतिवादीतर्फे वकील श्री.ए.पी.साठे यांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादी यांनी सदरचा अर्ज चुकीच्या तरतुदीखाली दाखल केला आहे. तसेच वादी यांना दाखल झालेल्या अहवालमध्ये दुरुस्ती करुन नव्याने दुसरा अहवाल दाखल करणेबाबतचा सदरचा अर्ज करता येत नाही. उपअधिक्षक भूमिअभिलेख यांनी दाखल केलेला अहवाल हा चुकीचा नसून वादी यांनी सदरचा अर्ज दावा लांबविणेचे हेतूने दाखल केला आहे.

५. अर्ज व म्हणणे वाचले अभिलेख पाहिले. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवादाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उपअधिक्षक भूमीअभिलेख, तासगांव यांनी मोजणी अहवाल नि.८७ कडे दिनांक १२.०४.२०१९ रोजी या न्यायालयात दाखल केला आहे. सदरचा अहवाल उपअधिक्षक भूमीअभिलेख यांनी बरोबर किंवा चुकीचा दाखल केला आहे तसेच त्यातील मजकूर चुकीचा किंवा

बरोबर आहे हे पुराव्याचे आधारे शाबीत होवू शकते. वादी यांनी अर्जात केलेली मागणी पाहता त्यांनी सदरचे अर्जाव्दारे दाव्यात पुरावा एकत्र करण्याच्या उद्देशाने तसेच दावा उकलून काढण्याच्या उद्देशाने निमतानदार यांचेमार्फत मोजणीचा मजकूर नमूद करुन दाखल केला आहे. वादी पुराव्याकामी उपअधिक्षक भूमीअभिलेख यांची साक्ष नोंदवून अर्जात नमूद केलेला मजकूराबाबत प्रश्न विचारु शकतात. परंतू वादी तसे न करता जाणुनबुजून दावा लांबविणेसाठी कायदयाच्या तरतूदींचा गैरफायदा घेवून वारंवार अशा प्रकारे अर्ज दाखल करीत आहेत. दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा सन २००८ पासून प्रलंबीत आहे. तसेच सन २०१९ च्या तपासणीमध्ये सदरचा दावा हा लवकरात लवकर निकाली करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. वरील सर्व कारणांचा विचार करता वादी यांचा अर्ज नामंजूर करण्याच्या निष्कर्षास येवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादी यांचा नि.९८ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी पुढे अशा प्रकारे अर्ज दाखल केल्यास त्यांचेविरुध्द आदेश पारित करण्यात येईल याची वादी यांनी नोंद घ्यावी.

Jyotimala Chandrashekhar Gupta

Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2021.03.12 15:48:19 +0000

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.१०.०३.२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | U.P.Patil |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 10.03.2021. |
| Order signed by the Presiding officer on | : | 12.03.2021. |
| Order uploaded on | : | 12.03.2021. |